# भुयारी 'मेट्रो ३'चे आणखी चार डबे आले !

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो ३ मार्गावरील पहिल्या मेट्रोसाठीच्या चाचणीसाठी आणखी चार डबे शुक्रवारी आरेतील सारीपूत नगर येथे दाखल झाले आहेत. चार डब्यांचा दुसरा रेक आंध्र प्रदेशातील श्रीसिटीहून मुंबईपर्यंत १ हजार ४०० किलोमीटरचा पल्ला गाठत दहा दिवसांनंतर पोहोचला आहे. ४२ टन वजनाचा प्रत्येक डबा खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८ - एक्सेल ट्रेलर्सना ६४ चाके असतात. आता येत्या दोन दिवसांत या डब्यांची



जुळणी करून सारीपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन तयार केली जाईल. त्यानंतर लगेचच ट्रेनच्या तपासणीसह चाचणी करण्यात येईल.